'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 121 (B): Stress Management at the Work Place
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

# उद्योगातील तणाव : एक सखोल अभ्यास

**प्रा. डॉ. शुभदा लोंढे**
महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी, पुणे – १७

**प्रस्तावना:**

गेल्या अनेक दशकांपासून लघुउद्योग देशाच्या आर्थिक विकासामध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे. आर्थिक विकासाबरोबरच देशातील प्रादेशिक भिन्नता दूर करण्यामध्येही लघुउद्योगांचा महत्वपूर्ण वाटा आहे. परंतु सध्याच्या काळात लघुउद्योगांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे त्यामुळे लघुउद्योजक ताणाखाली वावरताना दिसतात.हा ताण कशा प्रकारे कमी करता येईल हा या संशोधन अभ्यासाचा मुख्य हेतू आहे.

**ताणतणाव व्याख्या :**

१.कोणताही प्रसंग अथवा प्रासंगिक बदलला दिलेला नकारात्मक शारीरिक व भावनिक प्रतिसाद म्हणजे तणाव होय.

२.एखाद्या परिस्थितीतील मागण्या व उपलब्ध साधनसामुग्री यामध्ये असमतोल निर्माण झाल्याने शरीराची जी अवस्था होते तिला तणाव असे म्हणतात.

लघुउद्योजकांनांही अनेक प्रकारच्या ताणांना सामोरे जावे लागते. या ताणांचा परिणाम लघुउद्योजकांच्या शारिरीक व मानसिक आरोग्यावर व वर्तनावरही दिसू लागतो व त्यामुळे उद्योगाच्या विकासावरही त्याचा परिणाम होतो.

लघुउद्योग व्याख्या :केंद्रशासनाचे मार्गदर्शनानुसार लघुउद्योग व्याख्या –

"ज्या उद्योगांची सयंत्र व यंत्रसामुग्रीमधील गुंतवणूक रु. २५ लाखाच्या वर व रु. ५ कोटीपर्यंत आहे अशा उद्योगांना लघुउद्योग असे म्हणतात."

लघुउद्योगांचे महत्व :

लघुउद्योगांचे देशाच्या विकासातील महत्व अनन्यसाधारण आहे. लघुउद्योगांमधून अनेक रोजगारांची निर्मिती होते.लघुउद्योग कमी भांडवलात सुरु करता येतात. तसेच ते सुरु करणे सोपे असते.यात लवचिकता तर असतेच शिवाय प्रादेशिक संतुलन निर्माण करण्यात ते महत्वाची भूमिका बजावतात.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१. लघुउद्योग म्हणजे काय ते समजून घेणे.
२. लघुउद्योगातील ताणतणावांविषयी माहिती घेणे उपाय शोधणे.
३. लघुउद्योगातील ताणतणाव कमी करण्याच्या दृष्टीने उपाय शोधणे.

**संशोधनाचे अभ्यासक्षेत्र :**

पुणे, पिंपरी-चिंचवड-भोसरी विभाग हा प्रादेशिक विभागानुसार पश्चिम विभागामध्ये समाविष्ट होतो. हा पश्चिम महाराष्ट्र विभाग आर्थिक, सामाजिक व राजकीय दृष्टीने सर्वच बाबतीत आघाडीवर असल्याचे दिसून येते. विशेषतः पिंपरी-चिंचवड-भोसरी विभाग हा लघुउद्योगांचे केंद्र म्हणून भारतात प्रसिद्ध आहे. प्रस्तुत संशोधनाकरिता पिंपरी-चिंचवड-भोसरी हा विभाग निवडला आहे. मुला, प्रवरा, इंद्रायणी या नद्यांनी पावन झालेला हा प्रदेश असून पुण्याचा विस्तारित भाग म्हणून या भागाकडे पाहिले जाते. रस्ते, रेल्वे मार्गाने हा भाग मुंबई, बेंगलोर, हैद्राबाद, दिल्ली, कोलकाता, चेन्नई सारख्या महत्वाच्या शहरांशी जोडला गेलेला असल्यामुळे उद्योगाचे मोठे जाळे या भागात पसरले आहे. पिंपरी-चिंचवड-भोसरी विभाग "ऑटो हब" म्हणून ओळखला जातो.

**संशोधनाची अभ्यासपद्धती :**

सदर शोधनिबंधासाठी प्रामुख्याने प्राथमिक साधनसामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे. विविध लघुउद्योजकांशी प्रत्यक्ष संवाद साधून माहिती प्रश्नावलीच्या आधारे संकलित करण्यात आली आहे. प्राथमिक

MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA PIMPRI PUNE-17